निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २७३ वा.
रविवार :०७ डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

# देशाच्या विविधतेला एकत्र बांधणारे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिले -राज्यपाल आचार्य देवव्रत

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या दूरदृष्टीमुळे भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई** / कोणत्याही राष्ट्रात युगपुरुष जन्माला येतात तेव्हा सामाजिक न्यायाची चळवळ बळकट होते. भारत हा विविधतेने नटलेला देश असून इतक्या मोठ्या राष्ट्रात एकता, न्याय व समाजाची संघटित भावना दृढ करण्यासाठी संविधान निर्माण करणे हे अत्यंत मोठे व ऐतिहासिक कार्य होते. देशाच्या सामाजिक विविधतेत सर्वांना एकत्र बांधणारे व समान अधिकार प्रदान करणारे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्राला दिले, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

मुंबईतील दादरच्या चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, माजी मंत्री संजय बनसोडे, आमदार कालिदास कोळंबकर,आमदार चित्रा वाघ,आमदार अमित साटम, माजी खासदार तथा महाराष्ट्र राज्य त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष डॉ नरेंद्र जाधव, माजी खासदार राहुल शेवाळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आनंदराज आंबेडकर, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, समन्वय समितीचे उपाध्यक्ष महेंद्र साळवे आदींसह समाजाच्या सर्वक्षेत्रातील मान्यवर तसेच डॉ. बाबासाहेबांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले, एखादे व्यक्तिमत्त्व जगातून गेले तरी त्यांचे विचार व कार्य जनतेच्या अंत:करणात सदैव जिवंत राहतात, त्यातूनच बाबासाहेब अमर आहेत. कठोर परिस्थितीतून शिकून त्यांनी संपूर्ण समाजाचा भविष्यकाळ बदलण्यासाठी शिक्षणाला सर्वात मोठे शस्त्र मानले. एक सुशिक्षित व्यक्ती संपूर्ण घराचे, समाजाचे आणि देशाचे भविष्य बदलू शकतो हा संदेश त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दिला.

**ज्ञानाच्या बळावर बाबासाहेबांनी समाजात समता प्रस्थापित केली- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विषमता दूर करून समाजात समता, बंधुता आणि सर्वांना समान संधी देणारे संविधान देशाला दिले. ज्ञानाच्या बळावर त्यांनी समाजात समतेची जाणीव दृढ केली, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, बाबासाहेबांच्या दूरदृष्टीमुळे आज भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरला असून लवकरच तिसऱ्या क्रमांकावर झेप घेणार आहे. राष्ट्राच्या प्रगतीचा पाया बाबासाहेबांनीच घातल्याचे त्यांनी नमूद केले. ऊर्जा सुरक्षेच्या क्षेत्रात डॉ. आंबेडकरांचे योगदान अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, राष्ट्रीय विद्युत ग्रीडची संकल्पना भारताने बाबासाहेबांमुळे वेळेत स्वीकारली. त्यातून देश ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करत आहे.

भारतीय लोकशाहीची भक्कम पायाभरणी आणि सामान्य जनतेच्या हक्कांचे रक्षण हे बाबासाहेबांच्या संविधानामुळेच शक्य झाले, असेही श्री.फडणवीस यांनी स्पष्ट केले. जगातील सर्वोत्तम संविधान भारताकडे असून प्रत्येक प्रश्नाचे उत्तर याच संविधानात मिळते, असे त्यांनी नमूद केले.आगामी काळात चैत्यभूमी परिसरातील स्मारक विकासाची कामे पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

**महामानव बाबासाहेबांचे विचार राष्ट्राला मार्गदर्शक- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाची निर्मिती करून देशाच्या लोकशाहीला दृढ पाया दिला. त्यांनी उभारलेला संघर्ष हा मानवमुक्तीचा, समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता प्रस्थापित करण्याचा होता, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा ही बाबासाहेबांनी जगाला दिलेली त्रिसूत्री आजही समाज परिवर्तनासाठी मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या चार मूल्यांवर आधारित संविधान तयार करून तळागाळातील वंचित व दुर्बल घटकांना सशक्त करण्याचे ऐतिहासिक कार्य डॉ. आंबेडकरांनी केले, असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

### दादरच्या चैत्यभूमी येथे ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन




सर्वप्रथम भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करून डॉ. बाबासाहेबांना अभिवादन केले. यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते सर्व भिक्खूंना चिवरदान देण्यात आले. त्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने आयोजित छायाचित्र प्रदर्शनास मान्यवरांनी भेट दिली.

यावेळी चैत्यभूमीवर हेलिकॉप्टर मधून पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्य त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष डॉ नरेंद्र जाधव यांनी सर्व मान्यवरांना संविधानाची प्रत दिली.

# १३ डिसेंबरच्या लोकअदालतीत ई-चलान तडजोड प्रकरणे स्वीकारली जाणार नाहीत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/ येत्या १३ डिसेंबर २०२५ रोजी राज्यभर आयोजित करण्यात येणाऱ्या लोकअदालतीमध्ये ई-चलान प्रकरणांची तडजोड स्वीकारली जाणार नाही, असे स्पष्टिकरण अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडून जारी करण्यात आले आहे.सन २०२१ पासून प्रलंबित ई-चलान प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी वाहतूक विभागाकडून महाराष्ट्र राज्य विधी आणि सेवा प्राधिकरणाच्या मंजुरीने प्रयत्न केले जात आहेत. मात्र आगामी लोकअदालतीत वाहतूक विभागाकडून कोणतीही ई-चलान प्रकरणे तडजोडीसाठी ठेवली जाणार नाहीत, असे नमूद करण्यात आले आहे.

## नागरिकांनी अफवांना बळी पडू नये

दरम्यान, काही यूट्यूब, इंस्टाग्राम तसेच अन्य सामाजिक माध्यमांवर १३ डिसेंबरच्या लोकअदालतीत ई-चलान दंडात सवलत मिळणार असल्याचा खोटा प्रचार केला जात असल्याचेही निदर्शनास आले आहे. अशा अफवांमुळे नागरिकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता असल्याने पोलीस विभागाने नागरिकांना सतर्कतेचे आवाहन केले आहे.

वाहतूक विभागाचे नागरिकांना आवाहन

ई-चलान तडजोड किंवा दंडात सवलत याबाबत सामाजिक माध्यमांवरील अपप्रचारावर विश्वास ठेऊ नये. कोणत्याही अनधिकृत लिंकद्वारे ई-चलानची रक्कम भरणा करू नये. जर एखाद्या नागरिकाचे प्रकरण स्थानिक जिल्हा




विधी व सेवा प्राधिकरणाने तडजोडीसाठी ठेवले असल्यास, संबंधित न्यायालय किंवा स्थानिक वाहतूक पोलीसांशी थेट संपर्क साधावा, असे पोलीस अधीक्षक (मुख्यालय) सुनील भारव्दाज यांनी अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) कार्यालयाच्या वतीने कळविले आहे.

# भारतातील सर्वात मोठी रेल्वे भरती

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/ २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारतीय रेल्वेत एकूण १ लाख २० हजार ५७९ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत यासंदर्भात माहिती दिली. ही देशातील सर्वात मोठ्या सार्वजनिक क्षेत्रातील भरतींपैकी एक मानली जाते. २०२४ मध्ये ९२ हजार ११६ तर २०२५ मध्ये २८ हजार ४६३ पदांसाठी नोटिफिकेशन जारी झाले आहे. काय म्हणाले केंद्रीय रेल्वेमंत्री? सविस्तर जाणून घेऊया.

गेल्या ११ वर्षांत ५ लाखांपेक्षा जास्त नोकऱ्या २०१४-१५ ते २०२४-२५ या कालावधीत रेल्वेने ५ लाख ८ हजाराहून अधिक नोकऱ्या उपलब्ध करून दिल्या. याच्या तुलनेत २००४-१४ या दहा वर्षांत केवळ ४ लाख ११ हजार भरती झाल्या होत्या. म्हणजेच मोदी सरकारच्या काळात रेल्वेतील रोजगार निर्मितीत लक्षणीय वाढ झाल्याचे यावेळी केंद्रीय रेल्वेमंत्री म्हणाले.




**लोको पायलट ते ट्रॅक मेंटेनर पर्यंत विविध पदे**

या भरतीमध्ये असिस्टंट लोको पायलट (१८ हजार ७९९), टेक्निशियन, ज्युनियर इंजिनिअर, एनटीपीसी (पदवीधर व पदवीपूर्व), आरपीएफ सब-इन्स्पेक्टर (४५२), कॉन्स्टेबल (४२०८), पॅरामेडिकल स्टाफ, लेव्हल-१ ट्रॅक मेंटेनर, पॉइंट्समन अशी सुरक्षा, तांत्रिक आणि गैर-तांत्रिक श्रेणीतील पदे समाविष्ट असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# इच्छुक उमेदवार मतदार यादीत मयत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/ इच्छुक उमेदवार मतदार यादीत मयत आठ वर्षांनंतर होणाऱ्या महापालिका निवडणूकांमधली चुरस सध्या

आठ वर्षांनंतर होणाऱ्या महापालिका निवडणूकांमधली चुरस सध्या वाढली आहे. इच्छुक उमेदवारांची स्पर्धा संपविण्यासाठी थेट त्यांना मयत दाखविण्याचा पराक्रम करण्यात आला आहे. आता ऐन निवडणुकीच्या तोंडावर या उमेदवारांना आपण जिवंत आहोत हे सिद्ध करण्यासाठी जिवाचा आटापिटा करावा लागतोय. बघुयात नेमकं काय घडलंय.

हे आहेत सिडको परिसरातील भाजपचे मंडल अध्यक्ष अविनाश पाटील. भाजपशी एकनिष्ठ असलेल्या या कार्यकर्त्याने यावेळी नगरसेवक पदासाठी तयारी केली होती. मात्र ज्यावेळी मतदारयादी बाघितली त्यावेळी त्यांचंच नाव गायब असल्याचे समोर आलं. याच्या आणखी खोलात गेल्यावर समोर आलं ते धक्कादायक वास्तव. समोर धडधडीत उभ्या असणाऱ्या अविनाश पाटलांना चक्क मयत दाखवण्यात आलं.

याबाबत कारवाईची मागणी

मयत व्यक्तींची निवडणुक आयोगाच्या यादीत नावं असणं नवीन नाहीये. पण इथे चक्क जिवंत व्यक्तीलाच मयत दाखवण्यात आलंय. उमेदवारांनाच मयत दाखवण्याचा हा काही एकमेव प्रकार नाहीये. तर अश्या ३ उमेदवारांना मयत दाखवण्यात आलंय. तर काही ठिकाणी नावंच गायब केल्याचा आरोप होतोय. यामुळे या उमेदवारांना फक्त उमेदवारीच नाही तर मतदानावर सुद्धा पाणी सोडावं लागणार आहे. म्हणून याबाबत कारवाईची मागणी केली जातेय.

या सर्व उमेदवारांना आता आपण जिवंत आहोत हे सिद्ध करण्यासाठी कोर्टाच्या पायऱ्या चढाव्या लागणार आहेत. तर दुसरीकडे नाशिक जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणात लक्ष घालत कारवाईचं आश्वासन दिलंय.




निवडणुकीच्या तोंडावर घडलेल्या या प्रकारामुळे प्रत्येक उमेदवाराने आपल्या नावांची सखोल तपासणी करुन घ्यावी असं जिल्हाधिकाऱ्यांनी म्हटलंय. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नाशिक मध्ये प्रत्येक प्रभागात स्पर्धा निर्माण झालीये. त्यामुळे निवडणुकीच्या मैदानात उतरण्यापेक्षा मागच्या दाराने उमेदवारच गायब करण्याचा हा प्रयत्न आहे का? आणि जर तसं असेल तर यासाठी पैश्यांची देवाण घेवाण झालीये का हे प्रश्न उपस्थित होतायत.

# संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त डिजिटल संविधान चित्ररथाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/ राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त डिजिटल संविधान चित्ररथ तयार करण्यात आलेला आहे. या चित्ररथाचे आज ६ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रवींद्र नाट्य मंदिराच्या प्रांगणात, प्रभादेवी मुंबई येथे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, माजी राज्यमंत्री भाई गिरकर, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे, पु ल देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक श्रीमती मीनल जोगळेकर व इतर मान्यवर उपस्थित होते.



हा चित्ररथ राज्यात विविध ठिकाणी फिरणार आहे. या चित्ररथामध्ये संविधानाची माहिती, संविधानाच्या मुलतत्त्वावरील माहिती, महत्त्वाची घडामोडी व लोकशाहीच्या मुल्यांवरील कलात्मक सादरीकरण व याबाबतचे प्रदर्शन बघायला मिळेल. या चित्ररथाद्वारे संविधान बाबतची जनजागृती करण्यात येणार आहे. संविधानाची माहिती सर्वसामान्यांना माहित व्हावी, या उद्देशाने या चित्ररथाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

राज्यातील जास्तीत जास्त जनतेने या चित्ररथ प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी केले आहे.

# फास्टफुड आरोग्यास घातक

आहार आणि आरोग्य यांचा परस्परांशी अतूट संबंध आहे. मनुष्याच्या दैनंदिन कार्यक्षमतेवर, रोगप्रतिकारक शक्तीवर आणि शरीराच्या विकासावर त्याच्या आहारातील पोषक घटकांचा थेट प्रभाव पडतो. म्हणूनच आहारतज्ज्ञ रोजचा आहार चौरस व संतुलित ठेवण्याचा सल्ला देतात. पण आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत लोकांकडे स्वयंपाक करण्यासाठी वेळ नसतो, जेवण नीट बसून करण्याचीही सवड नसते. परिणामी 'झटपट मिळणारे' आणि 'खायला चविष्ट' फास्टफुड हा सहज उपलब्ध पर्याय बनतो.

लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण हे फास्टफुड मोठ्या आनंदाने खातात. विशेषतः शाळकरी मुलांसाठी तर फास्टफुड म्हणजे एखादी पर्वणीच! घरची भाजी-भाकरी, पोळी-भाजी खाताना जी मुले कुरकुर करतात, तीच मुले पिझ्झा, बर्गर, नूडल्स, पफ, फ्राय पदार्थ ताटात आले की अगदी मिटक्या मारत खाताना दिसतात. हीच सवय हळूहळू त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम करू लागते.

फास्टफुडचे मोठे नुकसान म्हणजे त्यातील *अत्यधिक मीठ, साखर, तेल आणि चरबीचे प्रमाण*. अशा पदार्थांत पोषक तत्त्वे अत्यल्प किंवा अगदी नगण्य असतात. अनेक पदार्थ अत्यंत तळलेले असल्याने त्यांच्या नियमित सेवनाने लठ्ठपणा वाढू लागतो. शिवाय हे पदार्थ अती प्रक्रिया केलेले (कळसहश्रू झीलर्शीशव) असल्याने त्यात केमिकल्स, कृत्रिम रंग, फ्लेवर, प्रिझर्व्हेटिव्ह यांचे प्रमाणही जास्त असते.

हे घटक शरीरातील नैसर्गिक प्रक्रियांना बाधा पोचवतात आणि दीर्घकाळात गंभीर आजार निर्माण करतात.

दोन वर्षांपूर्वी एका जगप्रसिद्ध फास्टफुड कंपनीने मान्य केले होते की त्यांच्या सुमारे साठ टक्के पदार्थांमध्ये कोणतेही पौष्टिक मूल्य नाही. या कंपनीची नुडल्स, कॉफी, चॉकलेट, केक, वेफर्स, केचप, पास्ता यांसारखी अनेक उत्पादने जगभरात प्रचंड लोकप्रिय आहेत. अनेक देशांतील संशोधनांनी काही फास्टफुड पदार्थात हानिकारक रसायने आढळल्याचे दाखवून दिले आहे. काही देशांत तर अशा घटकांवर बंदीही घालण्यात आली आहे. कंपनींनी काही घटक काढून टाकल्याचे सांगितले असले तरी बाजारात अजूनही अनेक असे पदार्थ विकले जात आहेत ज्यात आरोग्यास धोकादायक रसायने असल्याचे आरोग्य तज्ज्ञ सांगतात.

आज फास्टफुडचे सेवन मुलांमध्ये दिवसेंदिवस वाढत चालले आहे आणि त्याचा दुष्परिणामही दिसू लागला आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्या मुलांना-

*** स्थूलतेचा धोका**
*** हृदयरोगांचे प्रमाण वाढते**
*** मधुमेहाचा धोका लहान वयातच निर्माण होतो**
*** पचनाचे आजार**
*** मानसिक तणाव, चिडचिड**
*** रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे**
*** कधीकधी कर्करोगासारखे गंभीर आजार**

असे गंभीर परिणाम होऊ शकतात, असे आरोग्य तज्ज्ञांचे मत आहे. मुलांचे शरीर विकसित होत असताना अशा पदार्थांचा दुष्परिणाम अधिक होत असल्याने हे अधिक धोकादायक ठरते.

याउलट घरचे पौष्टिक, ताजे, संतुलित अन्न मुलांच्या आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. दूध, कडधान्ये, भाज्यांची भाजी, पोळी, पराठा, भात-डाळ, पोहे, उपमा, घरी केलेले लाडू, चटण्या यामध्ये सर्व आवश्यक पोषक तत्त्वे मिळतात.

पालकांनी मुलांना चवीपेक्षा *पोषणाचे महत्त्व* समजावून देणे गरजेचे आहे. मुलांच्या हट्टापायी वारंवार फास्टफुड देण्याऐवजी वेळ काढून घरचे चविष्ट आणि पौष्टिक पदार्थ तयार करून देणे ही पालकांची महत्त्वाची जबाबदारी आहे.

शेवटी एकच-

फास्टफुड चविष्ट असले तरी आरोग्यास अपायकारक आहे.

संतुलित, घरगुती, पौष्टिक आहारच आरोग्यासाठी खरा लाभदायक आहे.

# जोडीदार निवडतांना?

जोडीदार निवडतांना महिलांबाबत ती कशा स्वभावाची आहे? तिचं राहणीमान कसं आहे? तिचं वागणं कसं आहे? ती फॅशनेबल आहे का? याचा विचार करणे आवश्यक आहे. तसेच पुरुषांबाबत तो फॅशन पाहणारा आहे का? तो व्यसनी आहे का? हे पाहणे आवश्यक आहे. परंतु अलिकडील काळात तसं न पाहता लोकं महिलांबाबत विचार करतांना ती फॅशनेबल आहे का? हे पाहतात. ज्यातून ती फॅशनेबल असल्यानं घरात जेवढा पैसा येतो. तो पैसा खायला पुरत नाही. अशावेळेस संसाराची राखरांगोळी होते व व्याभीचार वाढतो व हीच बाब पुढं निदर्शनास आली की घटस्फोट होतात. तशीच असतात मुलंही. मुलांबद्दलही विचार करतांना त्याचं घरदार आहे का हे पाहतात. त्याला असलेली व्यसनं पाहात नाहीत. मुलगा तसा मिळतोही. परंतु जे घर असतं. ते घर त्याच्या आईवडीलांचं असतं. अन् तेच घर मुलगा होतकरु न निघाल्यास वा व्यसनाधीन निघाल्यास असलेलं घर हातातून जातं. ज्यातून घटस्फोटासारखे निर्णय घ्यावे लागतात. त्यानंही संसाराची राखरांगोळी होत असते.*

जोडीदार........ जोडीदार हा अतिशय महत्वाचा भाग आहे. त्यातच जोडीदारावर आपलं उज्वल भविष्य अवलंबून असतं. जोडीदार हा जर चांगला असेल तर संसाराची चांदी होत असते आणि तो जर योग्य नसेल तर संसाराची दुर्गती होते. हे तेवढंच खरं.

संसारचक्रात जोडीदार जसा महत्वाचा, तसं जोडीदार निवडीलाही स्वातंत्र्य असायला हवं. पुर्वी असं स्वातंत्र्य असायचं. त्या काळात स्त्रिया आपल्या स्वतःचा स्वयंवर आयोजीत करायच्या. त्यातच जे व्यक्ती त्या स्वयंवरात भाग घेत असत. ते त्या मुलींना त्या स्वयंवरात जिंकत असत. ज्यातून मनालायक जोडीदार मिळत असे. परंतु मध्यंतरीच्या काळात जोडीदार निवडीचं स्वातंत्र्य हिरावलं गेलं. स्त्रियांना गुलाम केलं गेलं. त्यातच त्या स्त्रियांवर आपले विचार लादण्यात आले. त्यानंतर तिच्या जोडीदार निवडीवर बंधनं आलीत. त्यानंतर ना तिचं स्वयंवर होवू लागलं. ना ती आपल्या स्वतःसाठी जोडीदार निवडू लागली.

जोडीदार....... निसर्गातील पशुपक्षीही आपल्यासाठी स्वतःच्या विचारानं जोडीदार निवडतात. सुगरण पक्षात जोडीदार निवडतांना आधी घराचा विचार केला जातो.

ज्यात सुगरण पक्षातील नर हे आपले घरटं बांधणं सुरु करतात. तेव्हा त्या घरट्यांना त्यांच्या माद्या पाहात असतात. ज्या त्यांच्या कला न्याहाळत असतात. त्यातच ज्या सुगरण पक्षाच्या नराची कला सुगरण पक्षाच्या मादीला भावते. तीच मादी त्या नराकडे आकर्षीत होते. त्यानःतर तिही त्याला घरटं बांधण्यास मदत करीत असते. हेच घडतं गरुडाच्या जातीत. गरुडाची मादी नरापेक्षा उःच उडत असते व ती प्रत्येक वेळेस एक तुटकी फांदी आपल्या चोचीतून खाली सोडत असते. जर ती फांदी त्या नरानं झेलली तर त्या नराला ती मादी पसंत करीत असते. उद्देश असतो. त्या असतो, त्या नरानं केलेली कामगीरी. कारण त्या पक्षात अतिशय उंच घरटं बांधलं जातं. अशावेळेस त्या घरट्यातून आपलं एखादं पिल्लं जर पडलं तर त्या पिल्लाला अलगद वरच्या वरच्या झेलून पकडण्याची क्षमता ही नरात असायला हवी. ही मादीची भावना. तसंच झालं आहे, आपल्या मानवजातीतही. पुर्वी झाडावर राहणारा मानव आज खाली जमीनीवर राहायला आला. त्या माणसानं जोडीदार निवडतांना स्वयंवर तपासलं. त्यानंतर मुलीचा विवाह हा तिच्या मायबापाच्याही मनानं घडवला. अन् त्याही काळाला आज मागं टाकत आता पशुपक्षाची जोडीदार निवडीची पद्धती आलेली आहे. आज जोडीदार निवडतांना प्रेम आणि खरंच तो आपल्या लायक आहे की नाही हे तपासण्यासाठी पशुपक्षांची पद्धत वापरली जाते. त्यातच आज त्या मुलाचं घर आहे का आणि आहे तर कसं? त्या मुलाची शेती आहे का? आहे तर किती?

पशुपक्षी हे आपले जोडीदार निवडतांना जशी आपली अक्कल वापरतात. तीच अक्कल आज वापरण्यात येत असलेली दिसून येत आहे.

काळ बदलला आहे व बदलत्या काळानुसार जोडीदार निवडीचीही पद्धत बदलली असून लोकांनी आपआपल्या मतानुसार जोडीदार निवडीची पद्धत बदलवलेली आहे. आता मुली त्या मुलाचं घरच नाही तर शेतीही आहे का हेही तपासतात आहे. मुलगा साधा असला की औओ विवाहाला चालतच नाही. आज लोकांना विवाह करण्यासाठी साध्या भोळ्या मुलामुलींची गरज नाही. गरज वाटते, एखाद्या मादक मुलांची, जो मुलगा व्यसन करतो. दारु, अफीम, गांजा पितो आणि पाजतो. त्यातच अशा मुलांना चित्रपट बघण्याचा शौक आहे काय? त्यातच अशा मुलांना रेस्टॉरंटमध्ये जाण्याचा शौक आहे काय? तसेच अशी मुलं ही डॉन्सबारमध्ये जातात का? हेही आजच्या काळात पाहिलं जात आहे. मात्र अशा मुलाजवळ घर असेल आणि तेही चांगलं असेल तर उत्तमच. परंतु तो मुलगा होतकरु आहे किंवा नाही? हे पाहिलं जात नाही. हीच वास्तविकता बऱ्याच घरात आज अनुभावयास मिळते. याबाबतीत मुलंही काही मागे नाहीत. त्यांनाही मुली या फॅशनेबल हव्यात. मग त्या मुलींचे बाहेर प्रेमचक्कर असले तरी त्यांना चालते. तू काहीही कर.

फक्त पैसे कमवून आण. ही फॅशन आज जोर धरु लागलेली आहे. आजच्या मुली जोडीदार निवडतांना कधीही स्वयंवर पद्धतीनं वागत नाहीत वा परीक्षा घेत नाहीत आणि मुलंही कधी त्या परीक्षेत उतरत नाहीत. मात्र पक्षी ज्याप्रमाणे आपला जोडीदार निवडतात. तशाच आजच्या मुलीही आपला जोडीदार निवडतात. परंतु पक्षी जोडीदार निवडतांना तो आपल्या किती कामाचा? याचा रास्त दृष्टीकोनातून विचार करतात. ज्यात लेकरांचं संगोपन हा भाग येतो आणि आजच्या मुली हा दृष्टीकोन बाजूला ठेवून केवळ मनोरंजन म्हणून जोडीदार निवडत असतात.

महत्वाचं म्हणजे जोडीदार निवडतांना ज्या प्रमाणे पशुपक्षी हे आपला जोडीदार आपली मुलं झाल्यावर आपल्या मुलांप्रती किती उपयोगाची ठरतील, हा विषय घेवून जोडीदार निवडतात. त्याप्रमाणे आजच्या मुलींनीही तसाच विषय अंगीकारावा. त्यांनी जोडीदार निवडतांना तेच मुल्य जोपासावं. मग तो मुलगा फॅशनेबल नसला तरी चालेल. तो मुलगा घेवून चालणारा असावा. त्यातच तो निर्वसनी असावा. त्याचं घर नसलं तरी चालेल. त्याच्या घरादाराचा विचार करु नये. कारण व्यसन जर नसतील तर असे व्यक्ती संसारात रमल्यावर कितीतरी घरं घेवून टाकतात. अन् व्यसनं जर असतील तर अशा व्यक्तीची पिढीजात घरं कितीही असली तरी ती नेस्तनाबूत होत असतात. तशाच मुलीही. मुलीही फॅशनच्या आहारी गेलेल्या असल्या तर बसल्या संसाराची धुळधानी होते. कारण फॅशन करण्यासाठी पैसा लागतो. अधिकच पैसा लागतो. तेवढा पैसा पतीजवळ नसल्यानं आणि आपल्याजवळही नसल्यानं वा जवळ असलेला पैसा फोशनला पूरत नसल्यानं, पैसा कमवायचा असेल तर व्याभीचारी बनावंच लागतो. ज्यातून तसा अट्टाहास सहन न झाल्यानं घटस्फोट होतो. जो संसारासाठी अतिशय घातक असतो. म्हणूनच फॅशनेबल मुलीही संसारासाठी चालत नाहीत.

विशेष म्हणजे मुलांमुलींनी जोडीदार निवडावा. परंतु त्यात केवळ वासनापुर्ती, फॅशनेबलपणा, व्यसनाधीनता हाच उद्देश ठेवू नये. उद्देश ठेवावा, संसार करणे. अन् तोही चांगला संसार करणे. जर असं जोडीदाराला करता येत नसेल तर त्यांनी विवाहच करु नये. कारण अशा लोकांनी विवाह करणे म्हणजे त्यांच्याच नाही तर त्यांचे आईवडील व त्यांचे आप्तमित्र यांच्या डोक्यालाच ताप असतो. यात शंका नाही.

**– अंकुश शिंगाडे**
**नागपूर**

# श्री.छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी पतसंस्था, ता. बीडच्या मानद सचिव पदी गोविंद वायकर यांची बिनविरोध निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड (प्रतिनिधी)** श्री. छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित, तालुका बीड यांच्या मानद सचिव पदावर शिक्षक बांधवांचा विश्वास जिंकलेल्या, अभ्यासू, कर्तव्यदक्ष आणि सर्वांच्या मदतीला सदैव तत्पर असलेल्या श्री. गोविंद वायकर सर यांची दिनांक ४ डिसेंबर रोजी सर्व संचालकांच्या एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली.

वायकर सर हे शिक्षकांच्या ऑनलाईन मार्गदर्शनापासून विविध प्रशासकीय कार्यांपर्यंत सदैव तत्पर राहणारे, स्वच्छ चारित्र्याचे व विश्वासू व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. शिक्षक विश्वास पॅनलच्या संघटनात्मक कार्यात त्यांनी निभावलेली महत्त्वपूर्ण भूमिका विशेष उल्लेखनीय आहे.



या निवडीबद्दल संस्थेचे माजी चेअरमन व पॅनल प्रमुख आदरणीय श्रीराम बहिर सर, विद्यमान चेअरमन विजयजी खोसे सर, व्हाईस चेअरमन दत्तात्रय कवचट सर, मार्गदर्शक तथा माजी सचिव शामराव वनवे व खांडे सर, माजी उपाध्यक्ष जितेंद्र पोथरकर व शिवनाथ म्हेत्रे, शिक्षक नेते तथा संचालक अंकुश निर्मळ, शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष व संचालक भगवान पवार, बहुजन शिक्षक संघटना राज्याध्यक्ष तथा संचालक विजयकुमार समुद्रे, ज्येष्ठ संचालक आनंद पिंगळे व सुरेश ढास तसेच संचालिका सौ. सुमित्रा आडसुळ व मनिषा मुंडे यांनी हार्दिक अभिनंदन केले.बीड तसेच संपूर्ण जिल्ह्यातील शिक्षक बांधवांनीही वायकर सरांचे बिनविरोध निवड झाल्याबद्दल अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

# भविष्यात पैशाचे महत्त्व शुन्य नि काम ऐच्छिक ठरेल

आर्टिफिशियल इंटेलिजेन्स (एआय) अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता आजच्या काळातील सर्वात परिवर्तनशील तंत्रज्ञानापैकी एक आहे. हे आपले जीवन, कार्यपद्धती आणि संवाद साधण्याची पद्धत बदलत आहे. एआय हे एकप्रकारे मशीनच्या रुपात मानवाप्रमाणे समस्या सोडवणे, निर्णय क्षमता, तर्कसंगतता व नवीन गोष्टी शिकण्याचे काम करते. आर्टिफिशियल इंटेलिजेन्सची संकल्पना प्राचीन काळापासूनची असून यात अनेक कथांचा देखील समावेश आहे. एआयचा औपचारिक अभ्यास हा २० व्या शतकात सुरु झाला. १९५६ मध्ये जॉन मॅकार्थी यांनी सर्वात प्रथम डार्टमाउथ कॉन्फरन्समध्ये 'आर्टिफिशियल इंटेलिजेन्स' ही संकल्पना वापरली. येथूनच एआयच्या अभ्यासाला सुरुवात झाली. एआयच्या विकासातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९५० मध्ये लन ट्युरिंग यांनी केलेली ट्युरिंग चाचणी. ही चाचणी मशीनची बुद्धिमत्ता क्षमता ही मानवी वर्तनाच्या तुलनेत वेगळी नसते हे स्पष्ट करते. येथूनच, भविष्यातील एआय संशोधन आणि विकासाचा पाया घातला गेला.

रोबोटिक्सचे भविष्य खूप महत्त्वाचे आहे, कारण ते मानवी जीवन अधिक सोपे, कार्यक्षम आणि सुरक्षित बनवेल. रोबोट्स आता केवळ उत्पादनापुरते मर्यादित नाहीत, तर ते कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने अधिक स्वायत्तपणे विचार करतील, शिकतील आणि नवीन परिस्थितीशी जुळवून घेतील. यामुळे आरोग्यसेवा, शिक्षण, आपत्कालीन व्यवस्थापन आणि वाहतूक यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये मोठे बदल अपेक्षित आहेत. रोबोट ही अशी साधने आहेत जी स्वायत्तपणे जाणू शकतात, तर्क करू शकतात, योजना करू शकतात आणि कृती करू शकतात. स्वतंत्रपणे कामे करण्यासोबतच ते मानवी क्षमता वाढवू शकतात आणि मानवी कृतींची नक्कल करू शकतात.

भारत हा जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या रोबोटिक्स बाजारपेठांपैकी एक आहे. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रोबोटिक्सच्या आकडेवारीनुसार २०२१ ते २०२४ पर्यंत भारतात रोबोट स्थापनेत सुमारे ८४ टक्के वाढ झाली. वार्षिक औद्योगिक-रोबोट स्थापनेच्या बाबतीत भारत आता जगातील सहाव्या क्रमांकाचा देश आहे. २०२५ मध्ये रोबोटिक्सचे भविष्य हा सर्वात मोठा प्रश्न आहे. कारण या क्षेत्राने सिद्धांताच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष अवलंबनात प्रवेश केला आहे.

एआयच्या विस्तारामुळे एकीकडे नोकऱ्यांवर टांगती तलवार उपस्थित झाली आहे. तर दुसरीकडे एआयच्या वाढत्या जाळ्यामुळे भविष्यात नोकरी गरजेपेक्षा छंद म्हणून केली जाईल. लोकं फक्त आवड म्हणून नोकरी करतील. हा बदल समाजाच्या रचनेत मूलभूतपणे बदल करेल आणि लोकांच्या भूमिका पूर्णपणे बदलेल. या बाबतीत जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती इलॉन मस्क यांनी धक्कादायक भविष्यवाणी करत एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्सद्वारे पूर्णपणे बदललेल्या भविष्यातील जगाचे व्यापक दृष्टिकोन सादर केले.

पुढच्या १०-२० वर्षात एआय आणि रोबोटिक्स इतके प्रगत होतील की जगातील बहुतेक कामं ही मशीन्स करतील. लोकं इच्छा असेल तरच काम करतील. जेव्हा मशीनच सर्व गरजा विनामूल्य किंवा अतिशय स्वस्तात पूर्ण करू लागतील, तेव्हा सध्याची चलनव्यवस्था आणि पैशाचे महत्त्व मोठ्या प्रमाणात कमी होईल. तुमच्या खिशातला पैसा, नोटा आणि बँक कार्ड्स भविष्यात कदाचित काहीही कामाचे राहणार नाहीत. एआय आणि रोबोटिक्स झपाट्याने विकसित झाल्यास 'पैसा' हे फक्त औपचारिक साधन राहील. कारण एआय आणि रोबोटिक्स इतक्या वेगाने प्रगत होतील की, उत्पादनासाठी मानवशक्ती किंवा मोठ्या संसाधनांची गरजच उरणार नाही. वस्तूंची मुबलकता वाढली तर 'पैसा' या संकल्पनेची किंमत उरेलच असे नाही.

भविष्यात ऊर्जा हीच खरी करंसी ठरू शकते. ऊर्जा ही उत्पादनाची मूळ ताकद असल्याने तिचे महत्त्व पैशापेक्षा जास्त होईल. इलॉन मस्क यांनी स्कॉटिश लेखक इयान बँक यांच्या 'कल्चर' सीरिजचा दाखला देत एका अशा समाजाचे वर्णन केले आहे की, जिथे काहीच कमी नसते आणि पैसा अस्तित्वातही राहत नाही. सोलर पावर्ड एआय आणि स्पेसमधून ऊर्जा मिळवणाऱ्या तंत्रज्ञानामुळे भविष्यात अशी दुनिया वास्तवात उतरण्याची शक्यता व्यक्त केली.

जग जसं पुढे चाललं आहे, तसं जगाचे भविष्य एआयद्वारे ठरवले जाईल आणि त्या जगात 'पैसा' नाहीसा होईल. नोकऱ्या पर्यायी छंद बनतील म्हणजेच लोकांना जीवन जगण्यासाठी काम करण्याची आवश्यकता राहणार नाही आणि गरिबी अस्तित्वात राहणार नाही. एआय आणि ह्युमनॉइड रोबोट्समध्ये पहिल्यांदाच खऱ्या अर्थाने गरिबी दूर करण्याची क्षमता आहे. कारण जेव्हा ह्युमनॉइड रोबोट्स उत्पादन स्वस्त आणि जलद करतील, तेव्हा मूलभूत वस्तू इतक्या परवडणाऱ्या होतील की आर्थिक संकट येणार नाही. तसेच लोकं कोणतेही उत्पादन आणि सेवा सहजपणे मिळवू शकतील.

टेस्ला ही ह्युमनॉइड रोबोट्स विकसित करणारी एकमेव कंपनी राहणार नाही. अनेक कंपन्या ह्युमनॉइड रोबोट्स विकसित करतील आणि तंत्रज्ञान जगाला श्रीमंत करेल. एआय आणि रोबोटिक्स तंत्रज्ञान जगातील प्रत्येकाला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा एकमेव मार्ग आहे. या प्रणाली विकसित होताना मानवी जीवनातील आर्थिक संघर्ष पूर्णपणे संपुष्टात येतील आणि मानवांना काम करायचे की नाही हे निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळेल. जेव्हा रोबोट सर्व कामं हाती घेतील तेव्हा सरकारला युनिव्हर्सल हाय इन्कम प्रदान करावे लागेल, जे साध्या मूलभूत उत्पन्नापेक्षा खूप जास्त असेल. येत्या काळात हा बदल अधिकाधिक स्पष्ट होईल.

**- शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे**

# दरी, भटक्या विमुक्त समुदायांचे प्रश्न, वृद्धांची काळजी, मुलांवरील अत्याचार, सायबर गुन्हे, जलवायू परिवर्तन आणि प्रदूषण अशा अनेक समस्या सरकार किंवा प्रशासन एकटी हाताळू शकत नाहीत

दरी, भटक्या विमुक्त समुदायांचे प्रश्न, वृद्धांची काळजी, मुलांवरील अत्याचार, सायबर गुन्हे, जलवायू परिवर्तन आणि प्रदूषण अशा अनेक समस्या सरकार किंवा प्रशासन एकटी हाताळू शकत नाहीत. हे सत्य आपण कोविड-१९ महामारीच्या काळात प्रत्यक्ष अनुभवले, जेव्हा स्वयंसेवकांनी आरोग्य यंत्रणेसोबत हातात हात घालून मोठ्या प्रमाणात जनतेला मदत केली.रुग्णालयांमध्ये मदत, अन्नदान, औषध व ऑक्सिजनची उपलब्धता करून देणे, जनजागृती मोहीमा, समुपदेशन या सर्व आघाड्यांवर कार्यरत असलेल्या स्वयंसेवकांनी समाजातील आशेचा दिवा प्रज्वलित ठेवला.

आज स्वयंसेवा ही युवांची ओळख बनत चालली आहे. तरुणाईच्या ऊर्जेला योग्य दिशा देणारी ही एक महत्त्वाची संधी आहे. राष्ट्रीय सेवा योजना (NSS), राष्ट्रीय छात्रसेना (NCC), रेडक्रॉस, स्काउट-गाईड, युवा मंडळे, स्वयंसेवी संस्था (NGO) यांच्यामाध्यमातून लाखो युवक समाजकार्यात सक्रिय झाले आहेत. त्यांच्या माध्यमातून निर्माण झालेले नेतृत्व सामाजिक परिवर्तनाचे इंजिन बनले आहे. स्वयंसेवा युवकांना जीवनदृष्टी देताना समाजाला विकासाचा हात देत राहते. तरुणांची नवोन्मेषी विचारशक्ती आणि स्वयंसेवेची संवेदनशीलता यांचे एकत्रीकरण हे समाजहिताचे सर्वात मजबूत सूत्र आहे.

पण स्वयंसेवेच्या या तेजस्वी चित्रामागे काही आव्हाने देखील आहेत. अनेक स्वयंसेवी संस्था पारदर्शकतेअभावी किंवा राजकीय स्वार्थाच्या विळख्यात अडकतात, तर काही ठिकाणी स्वयंसेवकांचे शोषणही होते. योग्य प्रशिक्षण, सुरक्षा आणि मानसिक आधाराची कमतरता दिसून येते. तसेच, स्वयंसेवा ही फक्त सामाजिक प्रतिमा निर्माण करण्याचे साधन आहे, असा गैरसमजही कुठेकुठे आढळतो. म्हणूनच स्वयंसेवेचे संस्थाकरण करताना मूल्यशिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, तसेच नैतिक तत्वांचा आग्रह ही आवश्यक बाब आहे. स्वयंसेवा म्हणजे फक्त फोटो काढून सामाजिक माध्यमांवर टाकणे नव्हे; तर प्रत्यक्ष जिथे तुटलेल्या हातांना आधार द्यायचा आहे, जिथे डोळे आसवे पुसण्याची वाट पाहत आहेत, जिथे एखादी आकांक्षा उजेडाच्या शोधात आहे, तिथे पोहोचणे हे स्वयंसेवेचे खरे ध्येय आहे.

स्वयंसेवेची व्यापक स्वीकार्यता वाढवण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने आपली भूमिका जागृत केली पाहिजे. कुटुंबातील मूल्यशिक्षण, शाळा-कॉलेजमधील सामाजिक उपक्रम, प्रशासनाची सहकार्यनीती, माध्यमांची सकारात्मक भूमिका, आणि नागरी समाजाचे भान या सर्वांचा समन्वय आवश्यक आहे. व्यक्तीच्या विकासात स्वयंसेवेची थेट भूमिका आहे कारण स्वयंसेवा व्यक्तीला आत्मनिष्ठा, संवेदनशीलता, जबाबदारीची जाणीव, नेतृत्वगुण आणि सामाजिक ज्ञान यांचे भांडार उपलब्ध करून देते. त्यातून निर्माण होणारी 'सोशल आयडेंटिटी' व्यक्तीचे जीवन अधिक अर्थपूर्ण करते.

मानवतेचे अस्तित्व टिकवायचे असेल, तर समाजात परस्पर सहकार्याची संस्कृती अधिक दृढ करावी लागेल. स्वयंसेवेची शक्ती ही फक्त देण्यात नसून जोडण्यात आहे. ती वर्ग, जात, धर्म, भाषा, लिंग, वंश अशा सर्व भिंती मोडून टाकते आणि सर्वांना समान दर्जा देते. स्वयंसेवक जेव्हा एखाद्या घरात अन्नाचा तुकडा पोहोचवतात, तेव्हा त्या घरातील माणसांमध्ये समाजाविषयी विश्वास निर्माण होतो. जेव्हा ते एखाद्या मुलाला शिक्षण मिळवून देतात, तेव्हा त्या मुलाच्या भविष्यात आशेचा दिवा पेटतो. जेव्हा ते जखमी निसर्गाला वृक्षारोपणाद्वारे मोबदला देतात, तेव्हा पृथ्वीचा श्वास दीर्घकाळ टिकतो. ही शक्ती कोणत्याही योजना, बजेट किंवा धोरणाने निर्माण केली जाऊ शकत नाही ती फक्त मनाने दिलेली असते.

'आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन' आपल्याला आठवण करून देतो की प्रत्येक व्यक्ती समाजासाठी महत्त्वाची आहे. आपल्या थोड्याश्या प्रयत्नात कोणाचातरी संपूर्ण जग दडलं असतं. आज जगात करोडो स्वयंसेवक आपली स्वार्थरहित सेवा देत आहेत आणि मानवी मूल्यांचा झेंडा उंचावत आहेत. त्यांची ही कृतिशीलता समाजाला दिशा देते, मानवतेला आधार देते आणि भविष्यासाठी आशेचा किरण ठरते. या दिवशी समाजातील सर्व स्वयंसेवकांचे मनःपूर्वक अभिनंदन करून आपण सर्वांनीही आपल्या क्षमतेनुसार समाजासाठी काहीतरी करण्याचा संकल्प करायला हवा.

जग बदलण्यासाठी मोठ्या क्रांतींची गरज नसते; एखादी छोटी सेवा, एखादे घेतलेले पाऊल, एखादे समजूतदार नाते - एवढ्यानेही परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होते. कधी कधी एखाद्याची स्मितही जग बदलू शकते. म्हणूनच, आजचा दिवस आपल्याला पुन्हा एकदा सांगतो सेवा हीच मानवतेची खरी भाषा आहे. आपण सर्वांनी एकमेकांसाठी जगलो, तर जगही आपल्यासाठी जगेल. मनाची उदारता म्हणजेच स्वयंसेवा, आणि स्वयंसेवा म्हणजेच मानवतेचा सर्वात सुंदर चेहरा होय. या व्रताला, या संस्काराला, या मानवी मूल्याला शतशः वंदन!

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## संक्षिप्त

### नामदेव साठे नगर फतियाबाद बुद्ध विहार येथे अभिवादन




**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/ सुभान शहा/** महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या६९.व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त नामदेव साठे नगर फतियाबाद बुद्ध विहार येथे अभिवादन करण्यात आले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन बुद्ध वंदना घेण्यात आली.या प्रसंगी मा.बबन साठे जिल्हा महासचिव रिपब्लिकन सेना यांनी महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिवनपटावर मार्गदर्शन केले.यावेळी मा . सुनील बोडखे पो. ऊपनिरिक्षक दौलताबाद पो स्टेशन,मा.महेश घुगे साहेब,मा.संजय राजपूत माजी ग्रा.पं.सदस्य फतियाबाद ,बाळु गायकवाड, आनंद साठे, विठ्ठल जाधव, बनसोडे बाबा, कृष्णा भालेराव,चैनसिंग ठाकूर,विजय बनसोडे, रंजना साठे, शोभा भालेराव, गयाबाई गायकवाड,सविता जाधव,संध्या गायकवाड,शारदा महांकळे, ताराबाई बनसोडे, सविता पागोरे उपस्थित होते.

### नादरपूर येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा




**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील नादरपुर ज्येष्ठ नागरिक कक्ष ग्रामपंचायत येथे ६ डिसेंबर भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, दुःखी, पीड़ितांचे उद्धारक, भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन व थोर स्वातंत्र्य सेनानी, प्रति सरकारचे नेता क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुण्यतिथि निमित्त स्मृति सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा केला या वेळी ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सर्व सदस्य तंटामुक्त अध्यक्ष पोलीस पाटील आशिया सेविका डॉ सुडके गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# तिरुपती - साईनगर शिर्डी - तिरुपती या नवीन साप्ताहिक रेल्वेसेवेचा शुभारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** तिरुपती - साईनगर शिर्डी - तिरुपती या नवीन साप्ताहिक रेल्वेसेवेचा शुभारंभ करण्यास रेल्वे बोर्डाने दिलेली मंजुरी ही दक्षिण-मध्य भारतातील रेल्वे प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि सोयीची ठरणारी घोषणा आहे. तिरुपतीतील श्री वेंकटेश्वर मंदिर आणि साईनगर शिर्डीतील श्री साईबाबा समाधीस्थळ या देशातील दोन प्रमुख धार्मिक स्थळांदरम्यान आता नियमित साप्ताहिक रेल्वे सेवा उपलब्ध होणार असल्याने भाविकांची मोठी गैरसोय दूर होणार आहे.



**नवीन साप्ताहिक गाडीची वैशिष्ट्ये**

गाडी क्रमांक १७४२५/१७४२६ तिरुपती - साईनगर शिर्डी - तिरुपती ही आठवड्यातून एकदा चालणारी साप्ताहिक एक्सप्रेस असून खालील प्रमुख शहरांमधून प्रवास करणार आहे.गुंटूर, सिकंदराबाद, विकाराबाद, परळी वैजनाथ, परभणी व छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) या रेल्वेमार्गामुळे आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमधील प्रवाशांना दोन्ही तीर्थक्षेत्रांना थेट जोडणारी सोयीची व किफायतशीर सुविधा उपलब्ध होईल.

**सेवेचा आरंभ**

१४ डिसेंबर २०२५ (रविवार) पासून तिरुपतीहून नियमित गाडी क्रमांक १७४२५ सुटणार,१५ डिसेंबर २०२५ (सोमवार) पासून साईनगर शिर्डीहून नियमित गाडी क्रमांक १७४२६ सुटणार.

**उद्घाटन विशेष गाड्या**

पहिल्याच आठवड्यात या नवीन सेवेला मोठा प्रतिसाद मिळावा आणि प्रवाशांच्या सोयीसाठी उद्घाटन विशेष गाड्या चालविण्यात येणार आहेत.गाडी क्रमांक ०७४२५ तिरुपती - साईनगर शिर्डी उद्घाटन विशेष, ०९ डिसेंबर २०२५ रोजी तिरुपतीहून प्रस्थान,गाडी क्रमांक ०७४२६ साईनगर शिर्डी - तिरुपती विशेष गाडी, १० डिसेंबर २०२५ रोजी शिर्डीवरून प्रस्थान.प्रवाशांसाठी लाभ दोन महत्त्वाच्या धार्मिक स्थळांदरम्यान थेट रेल्वे कनेक्टिव्हिटी.मार्गातील प्रमुख शहरांतील प्रवाशांना अतिरिक्त प्रवासी सेवा.उत्सव, शनिवार-रविवार सुट्ट्या व तीर्थयात्रा हंगामात अपेक्षित गर्दीची सोय.रोड ट्रॅव्हलच्या तुलनेत अधिक सुरक्षित, सोयीस्कर व किफायतशीर पर्याय.ही नवीन साप्ताहिक रेल्वे सेवा निश्चितच दक्षिण भारत आणि महाराष्ट्रातील प्रवाशांसाठी आशीर्वादच ठरणार आहे.

# भारतीय जनता मजदूर संघाची देहरादून येथे बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/प्रतिनिधी/**भारतीय जनता मजदूर संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष शंतप्रकाश जाटव यांच्या आदेशानुसार उत्तराखंड राज्यातील संघटन विस्तारासाठी देहरादून येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत राष्ट्रीय सचिव आरती गौर यांच्या उपस्थितीत संघटन विस्तार, भावी कार्ययोजना तसेच श्रमिक कल्याणाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस इगचड चे राष्ट्रीय महासचिव व दिल्ली प्रभारी चौधरी चरण सिंह, राष्ट्रीय सचिव लोकेंद्र तसेच उत्तराखंडच्या आरती गौर यांची प्रमुख उपस्थिती होती. दिल्लीहून आलेल्या मान्यवर पदाधिकाऱ्यांनी आरती गौर यांचा सत्कार केला. तर गौर यांनीही दिल्लीतील पाहुण्यांचे स्वागत करून कृतज्ञता व्यक्त केली.

बैठकीत उत्तराखंडमध्ये भारतीय जनता मजदूर संघाचा संघटनात्मक विस्तार वेगाने करण्याचा निर्धार करण्यात आला. विविध श्रमिक वर्गांसाठी स्वतंत्र बोर्ड स्थापन करणे, नवे पदाधिकारी नियुक्त करणे, तसेच श्रमिक कल्याणासाठी नव्या उपक्रमांची अंमलबजावणी करण्याबाबत प्राथमिक सहमती दर्शविण्यात आली. ही बैठक राष्ट्रीय अध्यक्ष शांतप्रकाश जाटव यांच्या सूचनेनुसार आयोजित करण्यात आली होती.

संघटनेने आगामी काळात राज्यातील श्रमिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत ठोस व प्रभावी पावले उचलण्याचा विश्वास व्यक्त केला.दरम्यान, महाराष्ट्रात संघटन कार्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या भारतीय जनता मजदूर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके, राज्य सचिव धनंजय कुलकर्णी, मराठवाडा सचिव चंद्रकांत पाटील आदी कार्यकर्त्यांचेही बैठकीत अभिनंदन करण्यात आले.

# भारताच्या कोट्यवधी दलित,पददलित, शोशित उपेक्षित समाजाचे मुक्तीदाते आहेत-आम. जयंत पाटील

**आत्ताच एक्सप्रेस**

**ईश्वरपूर (हिंदूसम्राट वृतसेवा)** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या भारत देशातील कोट्यावधी दलित,पद दलित,शोषित व उपेक्षित समाजाचे मुक्तीदाते आहेत. त्यांनी देशातील कोट्यावधी दलित,पद दलितांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देत आधुनिक भारताचा पाया घातला आहे,असे गौरवोद्गार माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांनी काढले. प्रतिसरकारचे प्रणेते क्रांतिसिंह नाना पाटील हे आपल्या वाळवा तालुक्याचे सुपुत्र आहेत,याचा आपणा सर्वाना सार्थ अभिमान आहे,अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.उरुण ईश्वरपूर येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने अभिवादन करण्यात आला. याप्रसंगी आ.पाटील बोलत होते.

प्रारंभी तहसिल कार्यालया समोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा,तसेच पंचायत समिती येथील क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुतळ्याचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यासही पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.आ.पाटील म्हणाले,जगातील लोकशाही यशस्वी झालेल्या मोठ्या देशात आपल्या भारत देशाचा समावेश आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाला दिलेल्या अद्वितीय राज्यघटने मुळे देशातील लोकशाही यशस्वी झाली आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी जुलमी इंग्रजी सत्तेविरुद्ध कडा संघर्ष उभा करून प्रति सरकार उभा केले आहे. त्यांनी सामान्य माणसांना न्याय मिळवून देत सामान्य माणसांच्या सुखी जीवनाचे स्वप्न पाहिले होते. सध्याच्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपण सर्वांनी डॉ.बाबासाहेब व क्रांतिसिंह यांच्या विचारांनी पुन्हा लढा उभा करण्याची गरज आहे.



यावेळी प्रा.शामराव पाटील राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष देवराज पाटील,शहराध्यक्ष शहाजी पाटील,माजी नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे,पै.भगवान पाटील,खंडेराव जाधव,अरुण कांबळे, शाकीर तांबोळीअंनिसचे कार्याध्यक्ष संजय बनसोडे,महेश पाटील,एल. एन.शहा,संग्राम पाटील, विजय कुंभार,सुभाषराव सुर्यवंशी,शंकरराव चव्हाण, दादासाहेब पाटील,महिला जिल्हाध्यक्षा सुस्मिता जाधव तालुकाध्यक्षा सुनिता देशमाने, युवक राष्ट्रवादीचे संग्राम जाधव दिग्विजय पाटील,अनिल पावणे, प्राचार्य राजेंद्र कुरळपकर, राजकुमार कांबळे,सागर चव्हाण सुनिल मलगुंडे, सचिन हांडे, रोझा किणीकर,कमल पाटील, संगीता कांबळे,मालन वाकळे, मनिषा पेठकर,स्वरुप मोरे, आयुब हवलदार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आश्रम शाळा घाणेगाव तांडा चे मुख्याध्यापक तथा विज्ञान विषयाचे शिक्षक संजय पाटील

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव / प्रतिनिधी** / सोयगाव तालुकास्तरीय ५३ वे विज्ञान प्रदर्शन जि.प. केंद्रीय प्रा.शाळा सोयगाव येथे गुरुवारी उत्साहात पार पडले.

त्यात सोयगाव तालुक्यातील वि.जा. माध्यमिक आश्रम शाळा घाणेगाव तांडा ता. सोयगाव प्रशालेतील मुख्याध्यापक तथा विज्ञान विषयाचे शिक्षक संजय पाटील यांच्या मनोरंजक गणितीय मॉडलिंग या दिलेल्या विषयावर आधारित गणितातील गंमती जमती या शैक्षणिक साहित्याची माध्यमिक गटातून तालुकास्तरावर प्रथम क्रमांकाने निवड झाली.

त्याबद्दल सावळतबारा केंद्रप्रमुख जनार्दन साबळे , सोयगाव केंद्रप्रमुख फिरोज तडवी,सावळतबारा केंद्रीय मुख्याध्यापक विठ्ठल , सावळतबारा महाविद्यालयाचे प्रा जिवन को, लते तसेच प्रशालेच्या वतीने दिवाकर लवांडे मु. अ.प्राथमिक, सहशिक्षक सुनील कवीश्वर, मनोज पाटील, देवचंद



बागुल, प्रवीण पवार, सलीम तडवी, सिद्धार्थ सरदार,अधीक्षिका वाडेकर मॅडम, शंकर पायघन, आकाश पेंढारे, श्रीमती वंदना जाधव, आम्रपाली इंगळे व मित्रपरिवारातील पत्रकार विजय पगारे , विकास पाटील,राजपूत, संदीप कळसकर,मख,वरांगणे , वाणी ,रवींद्र तेली, भागवत गायकवाड, गोपाल चव्हाण या शिक्षक मंडळींनी व माजी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# चिंचोली लिंबाजी येथील प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर दिन साजरा करण्यात आला

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड / प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील चिंचोली लिं,छत्रपती प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक, चिंचोली लिं येथे शनिवारी महामानव विश्वरत्न भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे मुख्याध्यापक योगेश काथार प्रवीण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन प्रीती उघडे यांनी केले.यावेळी विद्यार्थीनी भाषणातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाविषयी माहिती सांगितली,तसेच कल्पना पुरकर यांनी सविंधान गीत सादर केले, अवधूत गर्जे यांनी भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



याप्रसंगी अस्मिता वाकेकर, सुवर्णलता चव्हाण , सुनिता ठाकरे, कल्पना पुरकर, रोहिणी पवार, स्नेहा चौंडीये, अवधूत गर्जे,अमर केसरे गजानन धोंडकर, नागसेन इंगळे, राहुल खरात, संजय मैंद, कडूबा सागरे, गणेश काकडे,हरिदास काकडे, डिंगाबर पवार,तारा सोनवणे ,विलास पवार,आदी उपस्थित होते.

# बाल आनंद नगरी उपक्रमात उसळली उत्साहाची लाट; जिल्हा परिषद शाळेत भरला ज्ञान-अनुभवाची जत्रा

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव / विजय पगारे** /जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे व केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच दशसूत्री व आनंददायी शिक्षण उपक्रमाअंतर्गत, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांच्या संकल्पनेतून खरी कमाई - बाल आनंद नगरी हा उपक्रम भव्यदिव्य उत्साहात पुर्ण शनिवारी (दि. ६)संपन्न झाला.

शाळेच्या प्रांगणात हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाला पालक, गावकरी, माजी विद्यार्थी आणि मान्यवरांचा एवढा मोठा सहभाग होता की जणू काही गावात एखादा मोठी जत्रा किंवा बाजार भरल्याचा भास होत होता. प्रचंड उत्साह, कौतुकाची दाद आणि विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मिळालेल्या उदंड प्रतिसादामुळे शाळा परिसर आनंदनगरीत परिवर्तित झाल्याचे पहावयास मिळले.

विद्यार्थ्यांनी स्वतः हाताने तयार केलेली विक्री-केंद्रे, कला-प्रदर्शने, खेळ स्टॉल, खाद्यपदार्थ, हातगुंतीच्या वस्तू, छोटेखानी व्यवसाय, सेवा-केंद्रे, तिकीट





पद्धतीचे व्यवहार अशा विविध उपक्रमांनी पालकांची मने जिंकली. मुलांच्या चलाख गणिती व्यवहार कुशलता, पैशाचे व्यवस्थापन, संवाद कौशल्य, सृजनशीलता आणि आत्मविश्वास पाहून सर्व उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. नाविन्यपूर्ण उपक्रमाला बँक ऑफ महाराष्ट्र सोयगाव शाखा व्यवस्थापक धीरज भुरे, सोयगाव केंद्राचे केंद्रप्रमुख फिरोज तडवी, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा राधाबाई सोनवणे,सदस्य अण्णा वाघ, शालेय समिती सदस्य रंगनाथ लोखंडे, समाजसेवक कृष्णा पाटील,माजी विद्यार्थी संघ सदस्य राजू कुडके, समाजसेवक दत्तुभाउ रोकडे, नगरसेवक हर्षल काळे, समाजसेवक राजेंद्र दुतोडे, मुख्याध्यापक किरणकुमार पाटील.विशष उपस्थिती लाभली.उपक्रमामधून विद्यार्थ्यांनी व्यवहारातील गणित, सहकार्य, जबाबदारी आणि उद्यमशीलतेचा उत्कृष्ट अनुभव घेतला. पालकांनीही आपल्या मुलांच्या कल्पकतेचे आणि परिश्रमाचे मनापासून कौतुक केले.मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांनी सर्व मान्यवरांचे, पालकांचे, शिक्षकांचे आणि विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक आभार मानत उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षण हे केवळ पाठांतर नव्हे, तर जीवन जगण्याची कला शिकवणे हेच आमचे ध्येय आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

उपक्रमातून एकूण ३५,८७५ रुपये इतकी खरेदी-विक्रीचा व्यवहार झाला.

बाल आनंद मेळाव्यास पालकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवून त्यातही महीला पालकाचा सहभाग वाखाणण्या जोगा होता.कार्यक्रम यशस्वीते साठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,पदवीधर शिक्षक सुरेखा चौधरी,पंकज रगडे,रामचंद्र महाकाळ,सहशिक्षक मंगला बोरसे,सविता पाटील,प्रतिभा कोळी,शेख विखार,बिलाल बागवान,अनिल देसाई,तानाजी चव्हाण,शुभम देसले,पुनम लाड यानी अथक परिश्रम घेतले.

# गलवाडा येथे महापरिनिर्वाण दिन साजरा...

**छायाचित्र ओळ:गलवाडा येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करतांना**



**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव / सोयगाव** / गलवाडा अ ता. सोयगाव येथे शनिवारी महाप्रयाण (ता.६) दिनानिमित्त भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास सरपंच फिरोज पठाण व उपसरपंच मंगलाबाई बिऱ्हारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. श्रद्धांजलीपर कार्यक्रम भावपूर्ण वातावरणात पार पडला.

यावेळी सुशीलाबाई इंगळे, भगवान तायडे, ग्रामविकास अधिकारी सत्यनारायण पुल्लेवाड, अनिल इंगळे, सुनील सैदाणे, पोलीस पाटील मिलिंद सोनवणे, संतोष बिऱ्हारे, बळीराम सुरडकर, आकाश इंगळे, रवींद्र मंडवे, दिनेश माजाटे, राहुल इंगळे, साहेबराव बिऱ्हारे, भास्कर साळवे आदी मान्यवर उपस्थित होते. महामानवांच्या कार्याचा व विचारांचा ध्यास घेऊन समाजात समानता व बंधुता वाढविण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## संक्षिप्त

### विधान भवन येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** /भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विधानभवन येथे त्यांच्या प्रतिमेस विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.याप्रसंगी उपसचिव स्वाती ताडफळे कक्ष अधिकारी विनोद राठोड, नेहा काळे यासह उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

# संविधान ही राष्ट्राची सर्वात मोठी शक्ती - भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी** / भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी जालना महानगरतर्फे मस्तगड, कान्हैय्यानगर तसेच भाजपा जिल्हा कार्यालय जालना येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शहरातील विविध भागांत आयोजित या कार्यक्रमांना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा जालना जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, माजी जिल्हाध्यक्ष अशोक आण्णा पांगारकर, युवा नेते अक्षय भैया गोरंटयाल, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलिये, सिद्धिविनायक मुळे यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीकारी विचारांचा आणि सामाजिक परिवर्तनातील योगदानाचा उल्लेख करून वातावरण अधिक प्रेरणादायी केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, *भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय लोकशाहीला दिलेले भक्कम संविधान हे आपल्या राष्ट्राची सर्वात मोठी शक्ती आहे. संविधानामुळे देशातील प्रत्येक नागरिकाला समानता, न्याय, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित जगण्याचा अधिकार मिळाला आहे. समाजातील तळागाळातील व्यक्तीलाही स्वाभिमानाने उभे राहण्याची संधी मिळावी हीच बाबासाहेबांची दूरदृष्टी होती.

ते पुढे म्हणाले की, महापरिनिर्वाण दिन हा फक्त स्मरणाचा दिवस नसून संविधानातील मूल्यांची उजळणी करून ती आचरणात आणण्याची प्रतिज्ञा करण्याचा दिवस आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळेच भारतीय समाजाच्या सर्व स्तरांमध्ये जागृती निर्माण झाली असून सामाजिक भेदभाव निर्मूलन, शिक्षणाचा प्रसार आणि समतेच्या मूल्यांची रुजवण ही आज देशाच्या प्रगतीची आधारस्तंभ ठरली आहे.



दानवे यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले की समाजातील वंचित, दुर्बल घटकांपर्यंत शासकीय योजना आणि कल्याणकारी उपक्रम पोहोचवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. संविधानाने दिलेल्या अधिकारांसोबत कर्तव्यांची जाण ठेवून समाजहिताचे कार्य करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात सुनील पवार, अमोल कारंजेकर, देविदास देशमुख, राजेश जोशी, शिवप्रकाश चितळकर, जिवन सले, विजय पवार, कपिल दहेकर, गेंदालाल झुंगे, सुहास मुंडे, मनोज बिडकर, सुमित सुरडकर, आनंद झारकंडे, बाबुराव भवर, सागर वाहूळकर, शाम जाधव, जगदीश येनगुपटला, शिवराज जाधव, नारायण पवार, डोंगरसिंग साबळे, मुकेश चव्हाण, सुरेंद्र शेडूते, राजेश देसार आदी मान्यवर व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती जाणवून आली.

कार्यक्रमानंतर शिवतेज युवा मोर्चातर्फे डॉ. आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित पुस्तिका वाटप करण्यात आले. उपस्थितांनी संविधानातील मूल्यांचे संरक्षण करण्याची आणि सामाजिक सौहार्द राखण्याची प्रतिज्ञा करत कार्यक्रमाला उत्साहपूर्ण प्रतिसाद दिला.

## मुरुमाच्या अवैध उत्खननावर महसुलची धडक कारवाई ; दोदडगाव शिवारातून जेसीबी ताब्यात

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड प्रतिनिधी** / अंबड तालुक्यातील मौजे दोदडगाव शिवारात मुरुमाचे अवैध उत्खनन सुरू असल्याची गुप्त माहिती मिळताच महसूल विभागाने तात्काळ धडक कारवाई करत जेसीबी मशीन ताब्यात घेतले. गुरुवार, ०५ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी सुमारास दोन वाजता ही कारवाई करण्यात आली.

सूत्रांच्या माहितीनुसार, महसूल पथक येत असल्याचे लक्षात येताच जेसीबी चालकाने मशीन पळवून नेण्याचा प्रयत्न केला. मात्र महसूल पथकाने तातडीने पाठलाग करून सदर यंत्र थांबवण्यात यश मिळवले. त्यानंतर जेसीबी ताब्यात घेऊन तहसील कार्यालय, अंबड येथे जमा करण्यात आले.

ही कारवाई उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी व तहसीलदार विजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

**कारवाईत खालील अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला :**

* मंडळ अधिकारी सुखापुरी - विष्णू जायभाये
* मंडळ अधिकारी वडीगोद्री - संदीप नरुटे
* ग्राम महसूल अधिकारी - विशाल अनारूपे , योगेश गुरव , पवन तुपकर , श्याम विभुते




* महसूल सेवक - मनीष जिरेकर

अवैध उत्खननावर केलेल्या या तत्पर कारवाईचे स्थानिक नागरिकांकडून कौतुक होत आहे. पुढील तपास महसूल विभागामार्फत सुरू असल्याचे समजते.

# पोलिस पाटील संघटनेचा महा यलगार 'स्मरण मोर्चा' ११ डिसेंबरला नागपूरात; प्रलंबित मागण्यांसाठी राज्यभरातून मोठी उपस्थिती अपेक्षित

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / राज्यातील पोलिस पाटील संघटनेचा महा यलगार 'स्मरण मोर्चा' हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर ११ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे धडकणार आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या न्याय्य हक्कांसाठी राज्यभरातील हजारोंच्या संख्येने पोलिस पाटील या मोर्चात सहभागी होणार असून, शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा व्यापक आंदोलनात्मक उपक्रम राबवला जात आहे.



गावकामगार पोलिस पाटील संघटनेचे संस्थापक राज्याध्यक्ष शिवाजीराव कोलते पाटील , संस्थापक सचिव सचिन कमलाकर मांगले , कार्यकारी अध्यक्ष बळवंत काळे , तसेच राज्य उपाध्यक्ष जब्बार पठाण आणि अरुण बोडखे यांच्या मार्गदर्शनाखाली मंत्रालयीन स्तरावर विविध मागण्यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर नागपूर अधिवेशनादरम्यान 'महा यलगार स्मरण मोर्चा' आयोजित करण्यात आला आहे.

जालना जिल्ह्यातील सर्व पोलिस पाटीलांनी आपल्या हक्कांसाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष इलियास बागवान यांनी केले आहे. तसेच मराठवाडा अध्यक्ष विलास आर्डड , जिल्हा उपाध्यक्ष रामेश्वर मदन पाटील , कार्याध्यक्ष सुरेश पालकर , जिल्हा सचिव दादाराव पवार यांनीही मोठ्या प्रमाणावर उपस्थितीचे आवाहन केले.

या मोर्च्याचे स्वरूप स्नेहमेळाव्याचे नसून, संघटनेच्या एकजुटीचे आणि हक्कांसाठीच्या संघर्षाचे प्रतीक असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

शासनाकडे सादर होणाऱ्या प्रमुख मागण्या मोर्चादरम्यान शासनाकडे खालील महत्त्वाच्या मागण्या सादर केल्या जाणार आहेत :

* पोलिस पाटीलांचे निवृत्ती वय ६० वरून ६५ वर्षे करणे
* पाटील व त्यांच्या कुटुंबासाठी मेडिक्लेम योजना सुरू करणे
* १५ ऑक्टोबर २०११ नंतरचे प्रवास व दैनिक भत्ते मानधनानुसार वाढवणे
* शासनाकडून २५ लाख रुपयांचे विमा संरक्षण लागू करणे
* गृह व महसूल विभागातील भरतीत ५ टक्के आरक्षण पोलिस पाटीलांसाठी राखीव
* सलग १० वर्षे सेवा पूर्ण केलेल्या पाटीलांना शैक्षणिक पात्रतेनुसार रिक्त पदांवर थेट नियुक्ती
* नक्षलग्रस्त भागातील पाटील व त्यांच्या कुटुंबांना शस्त्र परवाना व सानुग्रह अनुदान वाढ
* ग्राम पोलिस पाटील अधिनियम १९६७ मध्ये सुधारणा
* निवृत्त पाटीलांना मानधनाच्या ५० टक्के निवृत्त सन्मान निधी

तालुका व जिल्हास्तरावर स्वतंत्र पोलिस पाटील सभागृह उभारणी

* नियुक्ती झाल्यानंतर पाच वर्षांनंतर नूतनीकरणाची सक्ती रद्द करून नियुक्ती सेवानिवृत्तीपर्यंत कायम ठेवणे .

राज्यभरातील पोलिस पाटील मोठ्या प्रमाणात सहभागी होतील, अशी अपेक्षा जालना जिल्हाध्यक्ष **इलियास बागवान** यांनी व्यक्त केली आहे. या भव्य उपस्थितीतून संघटनेची एकजूट आणि संघटनशक्ती शासनापुढे ठळकपणे अधोरेखित होईल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. नागपूर अधिवेशनात संघटनात्मक चर्चा तसेच पोलिस पाटीलांच्या भविष्यासंदर्भात महत्त्वाचे निर्णय होण्याची शक्यता आहे.

# राज्यघटनेने धर्मस्वातंत्र्य दिल्यामुळेच लोकशाही टिकली - अरविंद चव्हाण

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या भारतीय राज्यघटनेमुळेच विविध जाती-धर्मांना न्याय मिळाला आणि प्रत्येक नागरिकाला आपला धर्म पाळण्याचे स्वातंत्र्य मिळाले. या धर्मस्वातंत्र्यामुळेच आज लोकशाही टिकून आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा) पार्टीचे जिल्हाध्यक्ष व माजी आमदार **अरविंदराव चव्हाण** यांनी केले.






६ डिसेंबर २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जालना जिल्हा पक्ष कार्यालयात आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. पुढे चव्हाण म्हणाले, अलीकडच्या काळात काही मंडळींकडून जातीयतेचे विष पसरवले जात असून त्यामुळे समता आणि बंधुत्वाची हानी होत आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांनीच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार वाटचाल करत आहेत. समतेच्या विचारांशी पक्ष कधीही तडजोड करणार नाही.

कार्यक्रमात जालना शहर जिल्हाध्यक्ष शेख मेहमूद यांनीही भाषण केले. ते म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राज्यघटना ही जगातील आदर्श राज्यघटना आहे. राज्यघटना टिकली तरच लोकशाही टिकेल. त्यामुळे तिचे संरक्षण करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या शकुंतला ताई कदम , अण्णासाहेब चितेकर , मिर्झा अन्वर बेग , महिला शहराध्यक्षा रीकल्पा तायडे , प्रभाकर घेवंदे , सोपानराव तेलगड आदींनी अभिवादनपर विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शितल ताई बारोटे, मनकर्णा ताई डांगे, संगीता नागरगोजे, शिवराज जाधव, बबन गाडेकर, विजय सोनवणे, शिवचरण बाळराज, शेख इमरान बिल्डर, सतीश वाहुळे, सय्यद जावेद अली, शेख सोहेल, शेख शोहेब, मिर्झा आमेर, राहुल भगत, गणेश नवपुते, गजेंद्र सुपेकर, ज्ञानेश्वर क्षीरसागर, संतोष निकाळजे आदी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभाकर घेवंदे यांनी केले.

# सहकारी बँकांचे भवितव्य धोक्यात?

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** मंदिराचा पैसा हा देवतेचा असतो; तो अडचणीत सापडलेल्या सहकारी बँकांना वाचवण्यासाठी वापरला जाऊ शकत नाही, अशा कठोर शब्दांत भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. केरळमधील थिरुनेल्ली मंदिर देवस्वमच्या ठेवी परत देण्याच्या केरळ उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या सहकारी बँकांच्या याचिका फेटाळताना सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने हा स्पष्ट संदेश दिला.

**देवस्थानाच्या पैशांवरून सर्वोच्च न्यायालयाचे कठोर ताशे**

खंडपीठाने ठासून सांगितले की, मंदिरातील निधीचा वापर केवळ मंदिराच्या कल्याणासाठीच व्हायला हवा. तो कोणत्याही सहकारी बँकेच्या आर्थिक 'ऑक्सिजन'चा पर्याय बनू शकत नाही.



अडखळणाऱ्या बँकांना वाचवण्यासाठी तुम्हाला मंदिराचा पैसा का वापरायचा आहे? जास्त व्याज देणाऱ्या सुरक्षित राष्ट्रीयकृत बँकेत पैसा ठेवण्यास उच्च न्यायालयाने सांगितले; यामध्ये चुकीचे काय आहे? असा थेट सवाल न्यायालयाने याचिकाकर्त्या बँकांना केला.

धनावत यांची गंभीर चिंता : सहकारी बँकिंग क्षेत्र ढासळत्या विश्वासाच्या उंबरठ्यावर

या पार्श्वभूमीवर, नोटरी असोसिएशन, जालना यांचे कार्याध्यक्ष ड. महेश धनावत यांनी राज्यातील आणि देशभरातील सहकारी बँकांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची भावना व्यक्त केली आहे.

ड. धनावत म्हणाले-सर्वोच्च न्यायालयाचे मत ठेवीदारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने योग्य आहे, परंतु ते संपूर्ण सहकारी बँकिंग क्षेत्राच्या ढासळत्या विश्वासार्हतेकडे बोट दाखवणारे आहे. महाराष्ट्रात मलकापूर अर्बन, नगर अर्बनसह अनेक सहकारी बँकांवर आरबीआयने आर्थिक निर्बंध लादले आहेत. त्यामुळे हजारो ठेवीदारांचे पैसे अडकले असून, त्यांचा विश्वास पूर्णपणे डळमळीत झाला आहे.

त्यांनी स्पष्ट केले की, ग्रामीण व निमशहरी अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सहकार क्षेत्रालाच अस्तित्वाचा मोठा धोका निर्माण झाला आहे, आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणामुळे या धोक्याची जाणीव अधिक तीव्र झाली आहे.

सरकार आणि आरबीआयने तातडीने पावले उचलावीत - धनावतांचा आग्रह

धनावत यांनी सरकारकडे व नियामक संस्थांकडे खालील ठोस मागण्या केल्या आहेत :

१) सहकारी बँकांसाठी कठोर आणि सक्षम कायदे

गैरव्यवहार, कर्जवाटपातील अनियमितता, व्यवस्थापनातील हस्तक्षेप यांना आळा घालण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने एकत्रितपणे अधिक कडक कायदे करावेत.

२) ठेवीदारांना संपूर्ण आर्थिक संरक्षण

सध्याच्या ठेव विमा मर्यादा वाढवून, ठेवीदाराचा एकही रुपया बुडणार नाही अशी कायदेशीर हमी सरकारने द्यावी.

३) राजकीय हस्तक्षेपाची पूर्णपणे समाप्ती

सहकारी बँकांच्या संचालक मंडळातील राजकीय हस्तक्षेप थांबवून कारभार पूर्णपणे व्यावसायिक तत्त्वांवर चालेल, याची सक्तीने तरतूद व्हावी.

४) आरबीआयची सक्रिय भूमिका फक्त निर्बंध लादून थांबण्याऐवजी आरबीआयने बँका अडचणीत का येतात, याचा सखोल अभ्यास करून, त्यांना पुनरुज्जीवन पॅकेज उपलब्ध करून द्यावे.

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कन्हैया नगर येथील समाज बांधवांच्या वतीने अभिवादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ बोधिसत्व, भारतरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि मानवतावादी विचारांचे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कन्हैया नगर येथील समाज बांधवांच्या वतीने त्यांच्या पवित्र स्मृतीस कोटी कोटी विनम्र अभिवादन.कालचा दिवस केवळ स्मरणाचा नाही, तर त्यांच्या विचारांनी दिलेल्या प्रकाशदीपाला पुन्हा एकदा उजळविण्याचा आहे. सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि मानवाधिकारांसाठी त्यांनी केलेला संघर्ष हा भारतीय राष्ट्राच्या आत्म्यात कायमचा कोरलेला आहे. जगण्याची संधी नाकारली गेलेल्या आणि सामाजिक दडपशाहीला तोंड देणाऱ्या कोट्यवधी वंचितांना त्यांनी केवळ आवाजच दिला नाही, तर स्वाभिमान आणि हक्कांसाठी उठून उभे राहण्याची ताकदही दिली.भारतीय राज्यघटनेतून त्यांनी लोकशाहीचा पाया अधिक भक्कम केला. संविधानिक मूल्ये, स्वतंत्र न्यायव्यवस्था, समान नागरिकत्व, जात-पंथ-धर्माच्या पलीकडे जाणारा प्रगत विचार आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा दृढ आधार दिला. आज जगभरातील प्रगत विचारवंत ज्या सामाजिक लोकशाहीचे स्वप्न पाहतात, त्या विचारसरणीचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच.कन्हैया नगरमधील समाज बांधवांनी आज त्यांच्या स्मृतीपुढे आदरांजली अर्पण केली, ही केवळ श्रद्धांजली नसून त्यांच्या कार्याच्या, तत्त्वज्ञानाच्या आणि संघर्षशीलतेच्या मार्गावर चालण्याचा संकल्पही आहे. बाबासाहेबांनी दाखवलेला मार्ग हा व्यक्तीला सक्षम बनवणारा,



समाजाला जागृत करणारा आणि राष्ट्राला विकासाच्या दिशेने नेणारा आहे.

त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन प्रत्येक नागरिकाने समता, शिक्षण, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा अंगीकार करणे, हेच त्यांच्या स्मृतीला खरे अभिवादन ठरेल.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813